सोबत मा. प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, हॉटेल मॅनेजमेन्ट ॲण्ड कॅटरींग टेक्नालॉजी, एमबीए, पीजीडीएम, एमसीए, प्लॅनिंग, डिझाईन इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इत्यादी विविध प्रकरणी शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन संचालनालयाच्या मान्यतेबाबतचे पत्र क्र. २/एनजीसी/डीटीई-मान्यता/२०२३/५५७ दिनांक २१.६.२०२३ चे पत्र सोबत जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२३/ 1699
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक. 21 JUN 2023

**प्रति,**

**प्राचार्य,** संबंधित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

Directorate Of Technical Education
Maharashtra, Mumbai, India

roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>

# शै व 23-24 पासून अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरीग टेक्नॉलॉजी , एमबीए,पीजीडीएम,एमसीए, प्लॅनिंग डिझाईन इ.व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. विविध प्रकरणी शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर�

1 message

**DESK2 Desk Officer** <desk2@dtemaharashtra.gov.in> Wed, Jun 21, 2023 at 4:09 PM
To: DESK 3 ITCELL <desk3@dtemaharashtra.gov.in>, Umesh Kokate <uvkokate@dtemaharashtra.gov.in>, sudhir uparwat <sduparwat@dtemaharashtra.gov.in>, Mahendra Dabhade <mahendra.dabhade@dtemaharashtra.gov.in>, roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>, roaurangabad regional office <roaurangabad@dtemaharashtra.gov.in>, romumbai REGIONAL OFFICE <romumbai@dtemaharashtra.gov.in>, ronagpur regional office <ronagpur@dtemaharashtra.gov.in>, ronashik regional office <ronashik@dtemaharashtra.gov.in>, Joint Director Regional office <pune.dte@gmail.com>, DESK10 Desk Officer <desk10@dtemaharashtra.gov.in>, Mahendra Kirad <deo@dtemaharashtra.gov.in>
Cc: Govind Sangwai <gr.sangwai@gmail.com>

Respected Sir,
Pl, find the attached file.

Regards.
**Desk2**
Directorate of Technical Education.,
Maharashtra State, Mumbai.
(Ph No.022-68597-450, 442, 443)

---

**557.pdf**
3823K

21/06/23

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र.............दिनांक...........

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
क्र. २/एनजीसी/डीटीई-मान्यता/२०२३/ ५५८ दिनांक 21 JUN 2023

प्रति,
संचालक / प्राचार्य,
संबंधित संस्था, महाराष्ट्र राज्य

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, एमबीए, पीजीडीएम, एमसीए, प्लॅनिंग, डिझाईन इ. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. विविध प्रकरणी शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करून संचालनालयाच्या मान्यतेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्र. मान्यता-२०२३/प्र.क्र.५७/तांशि-४, दि. १९ जून, २०२३

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यतेच्या आधारे संदर्भीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन संस्था सुरू करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच नजिकच्या काळात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली / वास्तुकला परिषद,नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासन मान्यता येण्याची शक्यता आहे.

`संदर्भीन शासन निर्णयात नमूद केल्यानुसार शासन, शिखर परिषदा यांच्या अटी व शर्ती यांची पुर्तता, संयुक्त खात्यात मुतदठेव व शासन निर्णयातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा इ. कागदपत्रांची तपासणी करावयाची आहे. यास्तव संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या संस्थानी सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये नमूद केलेली कागदपत्रे तपासणीसाठी त्वरीत या संचालनालयास सादर करावेत. सदर कागदपत्रे बॉक्स फाईल मध्ये विवरणपत्रात नमूद केलेल्या क्रमानुसार व पृष्ठ क्रमांक नमूद करून सादर करावीत. त्याचप्रमाणे या बॉक्स फाईल मधील सर्व दस्तावेज Scan करून उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे फाईलला नाव देऊन सदरील सॉफ्ट फाईल PDF Format मध्ये या संचालनालयास नस्तीसोबत सादर करावी. उदा. एखाद्या संस्थेचा डीटीई कोड ५००१ असेल तर सॉफ्ट फाईलचे नाव "5001_2023-24" असे ठेवावे.

संबंधित संस्थांनी सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये नमूद कागदपत्रांसह व सॉफ्ट कॉपीसह या संचालनालयास सादर करून मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधीत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित संस्थाना आपले स्तरावरुन सदर परिपत्रक अग्रेषित करण्यात यावे. तसेच ज्या संस्थांनी त्यांचे अर्जासाठी शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये विहित नोंदणी शुल्क आपले कार्यालयास अदा केले नसल्यास ते त्यांचेकडून वसूल करण्यात यावे.

## विवरणपत्र अ

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया / वास्तुकला परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदांनी शै.व. २०२३-२४ करीता दिलेल्या मान्यता आदेशाची प्रत | |
| 2. | शासनामार्फत मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत. | |
| 3. | प्रस्तावित अभ्यासक्रमांसाठी संबंधित विद्यापीठाने / मंडळाने दिलेल्या संलग्नता आदेशाची प्रत | |
| 4. | सोबत जोडलेल्या प्रपत्र - 'अ' व 'ब' प्रमाणे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) ची मूळप्रत या संचालनालयास सादर करावे. | |
| 5. | शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये विहीत केल्यानुसार खालील प्रमाणे १० वर्ष मुदतीसाठी करण्यात आलेली संयुक्त मुदतठेवीची मुळपावती व त्याची साक्षांकित प्रत. | |
| 6. | शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार विहित नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास जमा करुन त्याची पावती सोबत जोडावी. | |
| 7. | नेमणुक करण्यात आलेल्या प्राचार्यांचा बायो-डाटा. | |
| 8. | संस्थेतील विद्यमान अभ्यासक्रमांसाठी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची यादी (नांव, पदनाम, नियुक्तीचा दिनांक, शैक्षणिक अर्हता, अनुभव, संपूर्ण वेतनश्रेणी, सध्या घेत असलेले वेतन इ. तपशीलासह) | |
| 9. | प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी नव्याने नियुक्त करण्यात आलेले शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नेमणूक आदेश, रुजू अहवाल यांच्या आदेशाच्या साक्षांकित छायाप्रती. | |
| 10. | अनुक्रमांक ९ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियुक्ती स्वीकारल्याबाबत संबंधित संस्थेचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर शपथपत्र. | |
| 11. | प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यात आलेली पुस्तके/ साहित्याची यादी, खरेदी केल्याचे बिल, तसेच संबंधीतास पैसे अदा केल्याबाबतच्या पावत्यांच्या साक्षांकित छायाप्रती. | |
| 12. | इमारतीचे बांधकाम क्षेत्राबाबत टॉयलेट, बाथरुम, लेडीजरुम, इ. सुविधा असल्याबाबत तसेच इमारतीत वीज, पाणी उपलब्ध असल्याबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र | |
| 13. | इमारतीत आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्यात आल्याबाबतची कागदपत्रे. (फायर अँड सेफ्टी प्रमाणपत्र) | |
| 14. | जागेचा ७/१२ उतारा / पी.आर. कार्ड | |
| 15. | अकृषक आदेश (N.A. Order) | |
| 16. | बांधकाम पुर्णत्वाचा दाखला | |
| 17. | भोगवटा प्रमाणपत्र | |
| 18. | सोबत जोडलेल्या प्रपत्र क मध्ये ॲडव्होकेट प्रमाणपत्र | |
| 19. | सोबत जोडलेल्या प्रपत्र ड मध्ये नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र | |

( प्रपत्र - अ )

(To be notarized on Rs. 100/- Stamp paper and should be submitted in original)

AGREEMENT

For observance of conditions prescribed by the Appex Bodies/ State Government for

1. Starting of New College with Degree or Post Graduate Degree in Engineering / Technology / Pharmacy / HMCT / Management courses (Technical Campus) etc.

2. Starting of Degree or Post Graduate Degree or Diploma or Post Graduate Diploma in existing College / Polytechnic / Institute or increase of intake of the existing courses.

(Retain either 1 or 2 whichever is applicable)

Information about institution & sanction of course etc.

1. Name of the Society :-

2. Registration No. :

3. Name of the College/Institute :-
(with instt. Code on DTE website)
(As per AICTE /PCI/ COA approval letter)

4. Address :-
(As per AICTE /PCI/ COA approval letter)

5. AICTE /PCI/ COA Permanent ID No. :-

6. Phone No./Fax No. :-

7. E-mail address :-

8. AICTE /PCI/ COA Approval Letter No. & Date :-

9. G.R. No. & Date of State Government GR:-

10. Courses and Intake :- (should be given in following table)

| (A) Existing | | | | (B) Newly Approved | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Full name of the courses | Duration | Intake | Sr.No. | Full name of the courses | Duration | Intake |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | Total (A) | | | | Total (B) | |

Total(A)+(B)

Conditions:

1. Rules and Regulations for the regular admissions as competent authority shall be abide by as announced every year and there shall be no deviation in the rules and regulations of the admissions.

2. Building requirement for each course shall be as per the requirement laid down by the Appex Bodies or the affiliating body.

3. Institute must recruit sufficient and eligible staff as per norms for running and maintenance of institution and pay scales of the teaching and non-teaching staff should be observed as per the directives given by the State Govt., Director of Technical Education and the Appex Bodies.

| Sr.No. | Name | Qualification | Designation | Date of appointment | Pay Scale |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

4. Books, Computers, Furnitures Machinery & Equipment shall be as per requirement of the Appex Bodies or the affiliating body.

| Sr.No. | Name of Suppliers | Bill No. & Date with Amount | Amount paid | Mode of payment & Details |
|---|---|---|---|---|
| | | | | |

5. (I) Management must clearly mention availability of land as per the prescribed requirement at the site shown in the plan, so that the College/Polytechnic/Institute can function smoothly.

(II) Management will deposit prescribed amount with nationalized or scheduled bank in joint fixed deposit account in the name of the President / Secretary of the society and the Director of Technical Education, Maharashtra State, Mumbai for 10 years period before starting of the new College / Polytechnic / Institute or starting of newly approved courses.

The details of joint fixed deposit should be given belows :-

Name of the Bank & Branch with postal Address :-

Amount of fixed Deposit Rs.
Period :- Date

(III) The original receipt/document of fixed deposit should be shown to the Director of Technical Education, M.S. Mumbai and after taking note of it in Director's Office the Original receipt will be kept in safe custody of the Collage / Polytechnic / Institute.

(IV) The amount so deposited will not be unilaterally withdrawn by the management without the concurrence of the Director of Technical Education, M.S., Mumbai.

6. The College/Institute will be established by the society registered for the purpose and observe rules and regulations pertaining to admissions, Governing Body, staff selection, running and maintenance of Institution.

7. The College or Institute shall make application to the concerned University for obtaining affiliation for the course as per the provisions of Maharashtra Public Universities Act, 2016 within the stipulated time along with prescribed fees. The Management and the College or Institute will be fully responsible for the academic loss of the students and all other consequences if the concerned University refuse to give affiliation to the institute or course after giving admission to students through Centralized Admission Process.

8. Institute will be permitted to charge fees as decided by the Fee Regulat Fee Regulating Authority / Govt. of Maharashtra and permitted by the Director of Technical Education, Maharashtra State, Mumbai for different courses.

9.No Capitation fees or donation either in cash or in kind will be taken from the student or his/her parents by the society for admission.

10.There will be no transfer of students from one institutions to other institutions on any ground at any stage, except it is within the rules or permitted by the Director of Technical Education, M.S., Mumbai.

11.As far as possible hostel accommodation for the girls will be provided by the management and efforts will be made to provide the hostel accommodation to boys also.

12.Institute must fulfill all the norms for essential requirements specified by Apex bodies.

13.Claims for grant-in-aid for recurring or non-recurring expenditure will not be permitted by the Government at any time, at any stage and for any reason.

14.Recognition by the Government and affiliating body can be withdrawn on the recommendations of the Director of Technical Education, Maharashtra State, Mumbai on the grounds of poor academic performance, financial irregularities, malpractice, disobedience of Government orders, not following rules and regulation framed by the Government for maintenance and running of institution.

15.The Directorate of Technical Education, M.S., Mumbai and his nominee or concerned Regional Jt. DTE and the nominee can undertake surprise visit and carry out the inspection of the institution at any time in respect of infrastructure facilities, land, building, staff and availability of machinery and equipment as per AICTE /PCI/ COA norms in case of receipt of complaint from anybody.

16.The institute will not close down at its own accord without the permission of the AICTE /PCI/ COA or State Govt. as the case may be. In case the institute is closed down for whatever reasons or closes its courses for whatever reason it should submit no objection certificate from course affiliating body and also submit affidavit on notarized stamp paper that no salaries or payment of arrears of staff or any other liability is pending with it and even after closing down the institute if such type of liabilities arises afterwards the institute will be solely responsible for it.

17.The society will pass the resolution in the General Body stating that, all the above conditions from 1 to 18 are acceptable to the society and binding on the society.

On behalf of the Society (Name of the Society / Trust) :-

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

I, Shri/Smt. -------------------------------------------------------Chairman/President of the above named society will agree and promise that, the society will pass a resolution in a General Body stating that, all condition are acceptable and binding on the00 society.

Witness1. President / Chairman

Place :-
Date :-

(प्रपत्र - ब)

हमीपत्र

(रुपये १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड केलेले)

आम्ही------------------------------------------ या सोसायटी / ट्रस्टचे अध्यक्ष, सचिव अनुक्रमे ------------------------श्री. व श्री.------------------तसेच----------------या संस्थेचे प्राचार्य, संचालक -----------------------------------खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतो की,

१. संस्थेमध्ये सुरु असलेल्या सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांची माहिती संस्थेच्या---------------------या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही.

२. संस्थेमध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या वेळी प्रसिध्द केलेल्या संस्थेच्या माहितीपुस्तिकेत खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

अ) संस्थेमध्ये मान्यताप्राप्त अभ्यासक्रम आणि प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता.

ब) प्रत्येक अभ्यासक्रमासाठी परिषदेच्या निकषाप्रमाणे मंजूर, भरलेली व रिक्त पदांची माहिती पदधारकांची नावे, त्यांची शैक्षणिक अर्हता आणि अभ्यासक्रमनिहाय शुल्क इत्यादी.

क) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थांमध्ये तक्रारनिवारण अधिकारी यांची नियुक्ती केली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून-----------------------------या लिंकवर उपलब्ध आहे.

ड) अँटी रॅगींग व अँटी कॅपीटेशन फी अ‍ॅक्टच्या तरतूदी संस्थेस बंधनकारक असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तीकेत व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून----------------------------या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच अँटी रॅगींग संदर्भात प्रवेशित विद्यार्थी व पालकांकडून विहीत नमुन्यातील रुपये १००/- च्या स्टँम्पपेपरवर हमीपत्र घेण्यात आलेले आहे.

इ) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार (विशाखा जजमेंट) शैक्षणिक संस्थांमध्ये होणा-या विद्यार्थीनींच्या छेडछाडीवर प्रतिबंध करण्याकरीता संस्थांमध्ये महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबतची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तिकेत व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली असून---------------------या लिंकवर उपलब्ध आहे.

फ) संस्थेत दिव्यांगांसाठी रॅम्प व त्यांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेली आहे.

ग) अग्नि प्रतिबंधक कायद्यानुसार संस्थेत आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आलेली आहे.

ह) संस्थेत सिगारेट/तंबाखू आणि इतर अंमली पदार्थांच्या सेवनापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याकरीता जागृती व तद्‌अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

ज) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुविद्या परिषद व कौन्सिल ऑफ फार्मसी यांच्या विहित मानका व प्रमाणका नुसार संस्थेमध्ये आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

वरील माहिती आमच्या माहितीनुसार बरोबर असून त्यात कोणतीही तफावत नाही. भविष्यात माहितीमध्ये तफावत किंवा खोटी असल्याचे आढळल्यास त्यास सर्वस्वी आम्ही जबाबदार राहू.

प्रपत्र क

# CERTIFICATE-1

## Certificate of an Advocate

## (To be produced in the Letterhead of Advocate)

1. Certificate of an Advocate
   (To be produced in the Letterhead of Advocate)

   The copies of <Trust/ Society/ Company> registration documents, Land documents, Land use Certificate, Land Conversion Certificate in respect of application submitted by <Name and address of the Applicant> who is an Applicant for establishment of new Technical Institution offering Technical Education Programme(s) were provided to me by<Name and address of the Applicant> for verification regarding their authenticity and appropriateness.

**A. Trust/ Society/ Company Registration Documents:**

| | |
|---|---|
| Registration Certificate No. | |
| Date of Registration | |
| Registered at | |
| Registered under the Act | |

1. I have verified the above-mentioned Trust/ Society/ Company registration documents from the Office of <Competent Authority>.
2. The above-mentioned Trust/ Society/ Company registration documents are/ are not registered at the Office of <Competent Authority>.
3. The above-mentioned Trust/ Society/ Company registration Documents are/ are not authentic.

**B. Land Documents:**

| Sl. No. | Name of the Deed Holder | Document No. | Survey No. | Registration No. and Date | Land Area in Acre |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

I hereby certify that:

1. I have verified the above-mentioned Land documents from the Sub Registrar Office<place>.
2. The above-mentioned Land documents are registered at the Sub Registrar Office<place>
3. The above-mentioned Land documents are authentic.
4. The above-mentioned Land documents are in the name of the Applicant.
5. The title of the Land pertaining to the above-mentioned Land documents are clear.
6. The Applicant is in Lawful possession of the Land pertaining to the above-mentioned Land documents.

**C. Land Use Certificate:**

| | |
|---|---|
| Letter No. | |
| Letter dated | |
| Issued by | |
| Extent of Land (in acre) | |

I hereby certify that:

1. The Competent Authority has issued the Land Use Certificate in respect of Land under reference for the proposed Institution mentioned above is…..
2. It has been approved by the Competent Authority.
3. I verified the above-mentioned Land use Certificate from the Office of<Competent Authority>.
4. The above-mentioned Land Use Certificate is authentic.
5. It has been issued for the full extent of Land.

**D. Land Conversion Certificate:**

| | |
|---|---|
| Letter No. | |
| Letter dated | |
| Issued by | |
| Extent of Land (in acre) | |

I hereby certify that:

1. The Competent Authority has issued the Land Conversion Certificate respect of Land under reference for the proposed Institution mentioned above is…..
2. It has been approved by the Competent Authority.
3. I verified the above-mentioned Land Conversion Certificate from the Office of <Competent Authority>.
4. The above-mentioned Land Conversion Certificate isauthentic.
5. It has been issued for the full extent ofLand.

**E. Land Classification Certificate:**

| | |
|---|---|
| Letter No. | |
| Letter dated | |
| Issued by | |
| Land Classification | |

I hereby certify that:

1. The Competent Authority has issued the Land Classification Certificate respect of Land under reference for the proposed Institution mentioned above is…..
2. It has been approved by the Competent Authority.
3. I verified the above-mentioned Land Classification Certificate from the Office of <Competent Authority>.
4. The above-mentioned Land Classification Certificate is authentic.
5. It has been issued for the full extent of Land.

Signature of the Advocate

Name of the Advocate ….. RegistrationNo. …..

Practicing at …..

Date:

Place:

Seal/ Stamp of the Advocate

*Strike off whichever is not applicable

प्रपत्र 3

# CERTIFICATE-2

## Certificate of an Architect Registered with Council of Architecture (To be produced in the Letterhead of Architect)

The copies of the approved Site Plan and Building Plans in respect of application submitted by <Name and address of the Applicant> who is an Applicant for establishment of new Technical Institution<Name of the Institutions> at <address> were provided to me by <Name and address of the Applicant>for verification regarding their authenticity and appropriateness.

Details of Site Plan and Building Plans

| | |
|---|---|
| Plans approved by | |
| Approval Number | |
| Date of Approval | |

I hereby certify that:

1. The Competent Authority has approved the site Plan and Building Plans of an Educational Institution at the proposed site mentioned above is.....
2. I have verified the above-mentioned site Plan and Building Plans from the Office of <Competent Authority>.
3. The above-mentioned site Plan and Building Plans have been approved by the Competent Authority.
4. The above-mentioned site Plan and Building Plans are authentic.
5. Construction of Building admeasuring with the following details has been completed in all respects as per the approved Building Plan.

| Sl. No. | Room No | Room type (mention Class Room/ Laboratory/ Toilet, etc.) | Carpet area (in m²) | Completion of Flooring | Completion of Walls and painting | Completion of Electrification and lighting |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**Details of the Occupancy/ Completion Certificate/ Building License/ Form D**

| | |
|---|---|
| Certificate approved by | |
| Approval Number | |
| Date of Approval | |

**Structural Stability Certificate**

| | |
|---|---|
| Certificate approved by | |
| Approval Number | |
| Date of Approval | |

I hereby certify that:

1. The Competent Authority has approved the Occupancy/ Completion Certificate/ Building License/ Form D and the Structural Stability Certificate, if applicable, mentioned above is.....
2. have verified the above-mentioned Certificates from the Office of <Competent Authority>.
3. The above-mentioned Certificates have been approved by the Competent Authority.
4. The above-mentioned Certificates are authentic.

Signature of the Architect

Name of the Architect ..... Registration No. .....

Date:

Place:

Seal/ Stamp of the Architect

*Strike off whichever is not applicable

विना अनुदानित तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका, पदविकोत्तर पदविका) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या विविध प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.९४/तांशि-४, दिनांक २३/५/२०१७

२) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ २०१७/३९, दिनांक ०८/०१/२०१८

प्रस्तावना :

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे , सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, पी.आय.ओ. व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नावात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ करणे, ट्रस्ट/सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे , महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व को-एज्युकेशन संस्थेचे महिला संस्थेत परिवर्तन करणे , संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व पदवी स्तरावरुन पदविका स्तरावर परिवर्तन करणे, मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम सुरु करणे या प्रस्तावांसाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क संदर्भाधीन क्र. (१) च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या अॅप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकमध्ये १) पीजीडीएम अभ्यासक्रमांच्या संस्थांचे रूपांतरण एमबीए अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये करणे २) संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमांचे रूपांतरण प्रथम पाळीत करणे ३) संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे या विषयांचा नव्याने समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. हे विचारात

घेऊन उपरोक्त संदर्भाधीन क्र (१) येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन वर नमूद सर्व विषयांबाबत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव निश्चित करण्यासंदर्भात सर्वसमावेशक शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यता प्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.(१) येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन वर नमूद सर्व विषयांच्या प्रस्तावावरील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या स्तरावर आकारावयाचे नोंदणी शुल्क व मुदतठेव अनुक्रमे Annexure "A" व "B" नुसार निर्धारीत करण्यात येत आहे.

Annexure "A"

विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी नोंदणी शुल्क

(रुपये)

| अ. क्र | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहे किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र | उर्वरित महानगरपालिका | इतर |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| २. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | नवीन अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी / एमबीए/ एमएमएस/ एमसीए/ पीजीडीएम/ पीजीडीबीएम अभ्यासक्रमांची पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर/ पदविकोत्तर पदविका महाविद्यालये | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| ४. | सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये तथा संस्थेत प्रथम वा दुसऱ्या पाळीमध्ये अतिरिक्त / नविन अभ्यासक्रम सुरु करणे व अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ५. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम | ६०,०००/- | ४५,०००/- | ३०,०००/- | १५,०००/- |
| ६. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये तथा संस्था बंद करणे | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ८. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांची दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे. | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ९. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत पी.आय.ओ.च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १० | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत एन.आर.आय. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ११ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १३ | ड्यूअल पदवी / इंटिग्रेटेड कोर्सेस | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १४ | परदेशी संस्था/ विद्यापीठ यांचा सहयोग | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |
| १५ | ट्रस्ट/ सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १६ | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १७ | संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे | नोंदणी शुल्क आकारण्यात येऊ नये | | | |
| १८ | पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट :-नविन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | | | | |
| | (१) पदवी | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| | (२) पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| | (३) पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका/ पदविकोत्तर पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| १९ | मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | पीजीडीएम अभ्यासक्रमांच्या संस्थांचे रूपांतरण एमबीए अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये करणे | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| २१ | संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमांचे रूपांतरण प्रथम पाळीत करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| २२ | संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |

Annexure "B"

विनाअनुदानित पदवी,पदव्युत्तर पदवी, पदविका, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/ महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी मुदत ठेव.

(रुपये)

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रमाची नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये | २२,५०,०००/- | २२,५०,०००/- |
| २. | औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये | १२,००,०००/- | १०,५०,०००/- |
| ३. | एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजी डीबीएम/अभ्यासक्रमाची नवीन पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका महाविद्यालये | १०,५०,०००/- | ९,००,०००/- |
| ४. | पदविका अभ्यासक्रमाची नवीन तंत्रनिकेतने (अभियांत्रिकी) | ९,००,०००/- | ७,५०,०००/- |
| ५. | वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ७,५०,०००/- | ७,५०,०००/- |
| ६. | संगणक प्रगत अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ३,००,०००/- | ३,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | २२,५०,०००/- |
| ८. | पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ९. | वाढीव प्रवेश क्षमता / पदवी/पदव्युत्तर पदवी (अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकान्वये निर्धारीत एका तुकडीसाठी) | १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १०. | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीन) | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ११. | एम.ई./एम.टेक./एम.फार्म/ इत्यादी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १२. | ड्युअल पदवी/ इंटिग्रेटेड कोर्सेस | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १३. | परदेशी संस्था/ परदेशी विद्यापीठ सहयोग | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |

२. सदर योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात येत असून सदरहू मुदत ठेव ही १० वर्षापर्यंत बँकेत ठेवण्यात यावी. त्या रकमेचे व्याज संस्थेच्या खात्यात जमा करावे आणि १० वर्षानंतर सदरहू मुदत ठेव संस्थेला परत करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०२२२१२१४५८८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

( म. मा. मोरवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

६. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, विभागीय अधिकारी, इंडस्ट्रियल अॅश्युरंस बिल्डींग, २ रा माळा, चर्चगेट, मुंबई
११. सर्व मा.मंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व मा.राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
१४. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई
१५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
१६. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
१७. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१८. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
१९. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२०. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
२१. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
२२. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
२५. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव
२६. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२७. निवडनस्ती, तांशि-४

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२३/प्र.क्र.५७/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १९ जून, २०२३.

**वाचा** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२३-२४/ ५०३, दि.०५.०.२०२३.

**प्रस्तावना :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधिन पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यात खालील तक्त्यात नमूद केलेल्या नवीन औषधनिर्माणाशास्त्र संस्था कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Sr. No. | PCI Code | Institute Name and Address | Institute Status (Aided/ Un-aided) | Program Name | Intake Approved by PCI A.Y. 2023-24 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PCI-5412 | Abha Gaikwad Patil College of Pharmacy, Khasara No. 8/1, Wardha Road, Mohagaon, Nagpur - 441 108 | Un-aided | B.Pharmacy | 60 |
| | | | | D.Pharmacy | 60 |
| 2 | PCI-5699 | Vishwabharati Academys College of Pharmacy, Jamkhed Road, Sarola Baddi, Near Chandan Plastic, Ahmednagar | Un-aided | B.Pharmacy | 60 |
| | | | | D.Pharmacy | 60 |
| 3 | PCI-6470 | Suryadatta College of Pharmacy Healthcare and Research SCPHR, 342, Patil nagar, Bavdhan, Pune - 411 021 | Un-aided | B.Pharmacy | 60 |
| | | | | D.Pharmacy | 60 |
| 4 | PCI-5565 | Brahma Valley Institute of Pharmacy, S. No.592 B, Trimbakeshwar Road, S.No. 592 B, At Anjaneri Trimbakeshwar Road, Tal Trimbakeshwar, Dist.Nashik - 422 213 | Un-aided | B.Pharmacy | 60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | PCI-7951 | Indubai Bhadane Pratishthans College of Pharmacy Borkund / 623/1A 624 and 623/2B, Parola Malegaon Road, NH-211 Dhule Solapur Highway, Borkund Tal.Dist. Dhule, DHULE, 424308 | Un-aided | B.Pharmacy | 60 |
| | | | | D.Pharmacy | 60 |
| 6 | PCI-6396 | Shriram Patishthan's Aditya Institute of Pharmacy 88/1, Ravalgaon Road, Vidyavihar Educational Campus, Selu Ta. Selu Dist. Parbhani - 431 503 | Un-aided | B.Pharmacy | 60 |

२. उपरोक्त संस्थांना खालीलप्रमाणे विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

**अटी व शर्ती**

१) सदर मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक

आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

३. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

४. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६१५१८१४१०८९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN JYOTINATH GHIRATKAR

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=bbb712ac44dfd391a1a4d7d8b24cf743fa81a59477dff3f6805f105ac91db1e0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=21524D9E84E57776BA1EE448660F3699BDD08917801A19974A72D568F57F5401, cn=NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2023.06.19 19:02:46 +05'30'

**(नि. ज्यो. घिरटकर)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
६) संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
७) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड कौन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
८) सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
९) निवड नस्ती/तांशि-४.